आर्थिक विकासात मानव विकास कार्यक्रम योजनेचे योगदान : विशेष संदर्भ परभणी जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
समाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयाचा
पीएच.डी. (Ph.D) पदवीसाठी सादर करावयाच्या
शोधप्रबंधचा आराखडा

संशोधक

प्रज्ञा प्रभाकरराव पांढरे

एम.ए. एम. फिल

मार्गदर्शक

डॉ. एस.एस. पतंगे

प्रोफेसर व संशोधक मार्गदर्शक अर्थशास्त्र विभाग प्रमुख

बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत जि. हिंगोली.

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर - 2023

1. प्रस्तावना

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून सरकारने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारल्यामुळे जनतेच्या विकासासाठी सरकारकडून वेगवगळ्या योजनाची निर्मिती करुन त्या तळागळातील लोकापर्यंत कशा पध्दतीने पोहचविता येतील या योजनाचा लाभ कशा प्रकारे नागरीकांना मिळेल या कारीता वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आखणी करुन त्याची अमलबजावणी केली जाते. आर्थिक दृष्टकोणातुन विकासाचा विचार केला तर विकासाच्या संदर्भात अविकसित, विकसनशिल, अल्पविकसित, गरिब, मागास इत्यादी शब्द प्रयोग वापरले जातात. तसेच दरडोई वास्तव उत्पन्न कमी असलेले राष्ट्र हे गरीब राष्ट्र होय येथे आधुनिकी करणाचा वापर सुरु झालेला नाही. असे राष्ट्र म्हणजे मागास राष्ट्र होय असे ढोबड मानाने म्हणता येईल. परंतु ज्या राष्ट्रामध्ये विकासाची सुप्त क्षमता आहे. मात्र त्या क्षमतेचा पर्याप्त वापर होत नसल्यामुळे या राष्ट्राचे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न वाढीचा वेग मंद असतो अशा राष्ट्रांची गणना अर्धविकसीत राष्ट्रामध्ये केली जाते.

अलीकडील काळात जागतीक पातळीवरील विविध देशाचे तीन वर्गात वर्गीकरण करण्यात आलेले आहेत. आर्थिक दृष्ट्या प्रगत असलेल्या भांडवलशाही राष्ट्राचे पहिले जग, आर्थिक दृष्ट्या प्रगत असलेल्या समाजवादी राष्ट्राचे दुसरे जग आणि आफ्रिका लॅटीन, अमेरिका व अशिया खंडातील अप्रगत किंवा गरीब राष्ट्राचे तीसरे जग. गेल्या काही दशकामध्ये दुसरा जगातील राष्ट्राचे एका अर्थाने नेत्रुत्व करणाऱ्या रशियाचे विघटन झाले आहे. एका अर्थाने साम्यवादी विचारधारेचा पराभव झाला आहे. व आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी खाजगीकरण, उदारीकरण, ,खुली स्पर्धा हाच एकमेव मार्ग आहे. असे बहुतेक विचारवंत मत होऊ लागले आहे. वरील बदलते संदर्भ लक्षात घेता भविष्यात जगातील राष्ट्राचे तीन गटा ऐवजी श्रीमंत व गरीब म्हणजे प्रगत व अप्रगत असेच दोन गट शिल्लक राहतील असे स्पष्ट दिसत आहे. मानवीविकास हे ध्येय आहे. तर आर्थिक विकास हे एक

साधन आहे. म्हणुन आर्थिक विकासाचे उद्दीष्ट हे जनतेचे जीवन समृध्द करणे हे असावयास पाहिजे. असे संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाद्वारे 1990 नंतर प्रकाशित मानवीविकास अहवालात प्रभावीपणे मांडले आहे. भारतात गेल्या 50 वर्षा मध्ये झालेला आर्थिक विकास व इतर देशाच्या अनुभवा वरुन दिसुन येते की, आर्थिक विकास व मानवीय विकास यात फारसा संबंध नाही.

मानवी विकासा करीता आवश्यक असणाऱ्या प्रमुख अटी म्हणजे रोजगाराच्या संधीत वाढ होणे दारीद्रय दुर करणे, समाजातील दुर्बल व निर्धन वर्गाला सबल व संपन्न बनविने, विकास प्रक्रियेत जनतेचे महतम सहकार्य घेणे विकासाला पोषक ठरणाऱ्या दिर्घकालीन योजनांना महत्व् देणे म्हणुन मानवी विकासा करीता तीन मुख्य उद्दीष्टे वृध्दीक किंवा विकास, समानता व लोकशाही हि आहेत. आर्थिक विकासा द्वारे मोठ्या प्रमाणात रोजगाराची निर्मिती झाली नाही. यामुळे गरीबीचे स्वरुप अधिक तीव्र झाले आहे. म्हणुन मानवी विकास अहवाल 1996 ने त्या गोष्टीवर भर दिला की रोजगार विहीन निष्ठूर विकास, मुक विकास मुळातुन न झालेला विकास व भविष्यहिन विकास या पासुन समाजाचे संरक्षण करायचे असल्यास आर्थिक विकासात एकुण देशांतर्गत उत्पादनाचा वृध्ददर त्वरित वाढू शकतो परंतु त्या तुलनेत रोजगाराच्या संधीत, उत्पादनात पर्याप्त वाढ होत नाही. निष्ठूर विकासात आर्थिक विकासातील लाभाचा फार मोठा हिस्सा देशातील संख्येने लहान असलेल्या समृध्द वर्गाला मिळतो तर **लाखो दुर्बल घटक व दारिद्री लोकांची आर्थिक परिस्थिती पुर्वी पेक्षा खडतर होते**. शहरी भागातील गलिच्छ झोपड पट्टयाची सतत वाढत जाणारी दुर्बल घटकांची लोकसंख्या व त्याचे सतत वाढत जणारे प्रमाण हे निष्ठूर विकासाचे निदेर्शक आहे. मुख विकासात लोकाशाहीचा विकास होत नाही. म्हणजे गरीब व कमी समृध्द वर्गाला अधिकार व हक्क प्राप्त होत नाही. गरीबांना अधिकार संपन्न बनविण्याचा मुळ उपाय म्हणजे त्यांना उत्पादनाचे साधन -संपतीचा हक्क प्राप्त करुन देणे शिवाय उच्च प्रकारचे शिक्षण

व कला कौशल्य प्राप्त करण्या करीता त्यांना पर्याप्त मदत केली पाहिजे. आर्थिक वृध्दी व मानवी विकास या संकल्पनामध्ये मुलभूत फरक असा आहे की, आर्थिक वृध्दीमध्ये केवळ राष्ट्रीय उत्पन्न्ा वाढीवर भर दिला जातो. मात्र मानवी विकासात मानवी जीवनाच्या सर्व अंतर्गाचा म्हणजे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादीचा समावेश होतो. म्हणजेच मानवी विकास घडवून येण्यासाठी आर्थिक वृध्दी गरजेची असतेच. मात्र वेगळ्या दृष्टी कोणातुन त्या मागील तत्व असे आहे कि, मानवी निवडीच्या विस्तारासाठी राष्ट्रीय उत्पन्ना पेक्षा उत्पन्नाचा वापर आधिक निर्णायक ठरत असतो. लोकांच्या जीवनामध्ये सुधारना घडवून आणन्यासाठी उपलब्ध असलेले पर्याय आर्थिक वृध्दीच्या गुणवत्तेवर अवलंबुन असतात. त्यामुळे आर्थिक वृध्दी विकासाचे केवळ एक साधन आहे. विकासाचे अंतिम ध्येय नाही, उत्पन्न हे मानवी सुस्थितीमध्ये तेंव्हाच योगदान करते जेंव्हा ज्या पासुन प्राप्त लाभाचे रुपांतर आधिक समृध्द मानवी जीवनामध्ये होते. त्यामुळे केवळ उत्पन्नातील वाढ हे अंतिम ध्येय नसावे. तर त्या वाढीची गुणवत्ता मानवी सुस्थितीसाठी निर्णयाक ठरत असते. राष्ट्राची खरी संपत्ती हि राष्ट्रातील लोक असल्याने मानवी जीवनाची समृध्दी हेच विकासाचे ध्येय असले पाहिजे. मानवी विकासाची संकल्पना हि मानवी प्रयत्नाचे अंतीम ध्येय असुन लोकांना चांगल्या जीवनाचा आनंद घेण्यासाठी सक्षम बनविण्याशी संबंधीत आहे. हे ध्येय केवळ उत्पन्न किंवा भौतिक सुस्थितीमध्ये सुधारणाकरुन साध्य होऊ शकत नाही. आर्थिक वृध्दी व मानवी विकास या संकल्पनामध्ये मुलभूत फरक असा आहे की, आर्थिक वृध्दीमध्ये केवळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीवर भर दिला जातो. मात्र मानवी विकासात जीवनाच्या सर्व अंगाचा समावेश असतो. आर्थात मानवी विकास घडवून येण्यासाठी आर्थिक वृध्दी गरजेची असते मात्र वेगळ्या दृष्टी कोणातुन त्या मागील तत्व असे आहे कि, मानवी निवडीच्या विस्तारासाठी राष्ट्रीय उत्पन्ना पेक्षा उत्पन्नाचा वापर अधिक निर्णायक

ठरत असतो. राष्ट्राची खरी संपत्ती हि राष्ट्रातील लोक असल्याने मानवी जीवनाची समृध्दी हेच विकासाचे ध्येय असले पाहिजे.

मानव विकास संकल्पना

जनतेची सुस्थिती हे विकासाचे ध्येय असते केवळ पैसा लोकांची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा अंगानी सुस्थिती निर्माण करु शकत नाही. त्यामुळे संयुक्त राष्ट्राने मानव विकास या संकल्पनेचा पुरस्कार केला आहे. संयुक्त राष्ट्राने मानवी विकासाची व्याख्या करतांना असे म्हटले आहे कि, "लोकांच्या निवडीच्या विस्ताराची प्रक्रिया (Process of enlarging people choices) अशी केली आहे. तसेच लोकांना मिळणाऱ्या संधीचा परीघ मोठा करण्याची प्रक्रिया म्हणजे मानव विकास होय. मानव विकास म्हणजे अशा वातावरणाची निर्मिती ज्यामध्ये व्यक्तींना त्यांच्या क्षमता विकसित करता येतील त्यांच्या गरजा व इच्छेनुसार सर्जनशील व फल दायी आयुष्य जगता येईल. तसेच समाज कल्याणाकरीता निर्णय प्रक्रियेत सहभागी होता येईल. मानवी विकासाच्या संकल्पनेमध्ये व्यक्तीला केंद्रस्थानी मानले जाते. मानवी जीवनाचा विकास मोजण्यासाठी मानव विकास निर्देशाकाचा वापर केला जातो. मानव विकास निर्देशांक विकसित करण्याचे श्रेय पाकिस्तानातील अर्थतज्ञ डॉ. महेबुब उल हक्क व भारताचे नोबल पारितोषिक विजेते प्राध्यापक अमर्त्य सेन यांना दिले जाते. मानव विकास निर्देशांक तयार करण्यासाठी सरासरी आयुष्यमान त्यामुळे जनतेच्या आरोग्य व निरोगी जीवनाची कल्पना येते, ज्ञान ज्यामध्ये देशाच्या प्रौढ साक्षरतेचे प्रमाण आणि देशात प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पटनोंदणीचे प्रमाण व देशाचे दरडोइ उत्पन्न्ा या बाबीचा विचार केला जातो.

मराठवाडा विभागातील आठ जिल्हया पैकी एक परभणी जिल्हा असुन पुर्वी प्रभावतीनगर या नावाने ओळखला जात असे मराठवाड्यातील इतर भागाप्रमाणेच

परभणी जिल्हा प्रथम निजामाच्या आधिपत्याखाली होता. त्या नंतर हैद्राबाद राज्याचा तो भाग बनला 1956 मध्ये राज्याचे पुनर्गठन झाल्यानंतर ते तत्कालीन मुंबई राज्याचा एक भाग बनला 1960 नंतर हा सध्याचा महाराष्ट्र राज्याचा एक भाग आहे.

परभणी जिल्हयाचे भौगोलीक स्थान मराठवाड्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असुन परभणी या जिल्हयाच्या मुख्यालय ठिकाणी पोहचण्यासाठी रेल्वे, राष्ट्र महामार्ग व राज्य महामार्ग उपलजब्ध आहे. मराठवाड्याच्या आठ पैकी पाच जिल्हयाच्या सिमा परभणी जिल्हयास लागुन आहेत. 2011 च्या शासन निर्णयानुसार मानव विकास कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमात जिल्हया ऐवजी तालुका हा घटक विचारात घेण्यात आलेला असुन मानव विकास कार्यक्रमामध्ये 23 जिल्हयातील 125 तालुक्याचा समावेश असुन परभणी जिल्हयातील 9 तालुक्याचा समावेश आहे. मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी मुख्यता शिक्षण, आरोग्य व उत्पन्न वाढ या बाबीचा समावेश करण्यात आलेला आहे. शासन निर्णयानुसार मानव विकास कार्यक्रम हा क वर्ग नगर पालिका क्षेत्रातहि राबविण्यात येत असुन परभणी जिल्हयात एकुण 6 क वर्ग नगर पालिका व एक नगर पंचायत आहे. परभणी जिल्हयाचा मानव विकास निर्देशांक 0.683 इतका असुन मानव विकास निर्देशांक उंचावण्याच्या दृष्टीने मानव विकास कार्यकमांतर्गत शिक्षण, आरोग्य, उत्पन्न वाढ या विविध योजना राबविण्यात येतात. उत्पन्न वाढ म्हणजे रोजगार निर्मितीसाठी ज्या योजना राबविण्यात येतात त्या योजनातुन झालेली रोजगार निर्मितीचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्यामध्ये मानव विकास कार्यकमांर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कृषि कार्यालय, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, जिल्हा पशु सवंर्धन विभाग, जिल्हा परिषद या विभागा मार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनाचा अभ्यास करण्यात येईल.

2. संशोधन विषयाची निवड

स्वातंत्र्य प्राप्तीपासुन आज पर्यंत भारताने समाजवादी लोकशाही या तत्वाच्या आधारावर कल्याणकारी भूमीकेचा स्विकार केला. त्यामुळे जन कल्याण्याच्या दृष्टीने शासन वेळो वेळी वेगवेगळ्या प्रकारच्या योजना तयार करुन त्या योजनाची अमलबजावणी करीत असते. जेणे करुन समाजातील तळागळातील लोकांच्या जीवनाला आधार देण्याचे कार्य केले जाते. प्रामुख्याने राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक व इतर शेतकरी, अनुसुचित जाती व जमाती मध्ये शेतकरी यांच्या रोजगार निर्मितीवर भर देण्यासाठी मानव विकास कार्यमांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कृषी कार्यालय, जिल्हा परिषद, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, जिल्हा पशुसवर्धन विभाग, जिल्हा परिषद या विभागाकडून रोजगारावर भर देण्यासाठी तालुका स्पेसिफिक योजने अंतर्गत ज्या योजना राबविले जातात. त्यातुन मानव विकासातून दुर्बल घटकाच्या आर्थिक विकासात बदल होते काय याचा शोध घेण्यासाठी प्रेरित होऊन या विषयाची निवड केली आहे.

3. संशोधन विषयाचे महत्व

प्रस्तुत संशोधन विषय राष्ट्रीय स्तरावरचा महत्वाचा प्रश्न असल्यामुळे या मानव विकास कार्यक्रमामुळे होणारा रोजगार निर्मितीतून दुर्बल घटकातील आर्थिक विकास यावर प्रकाश टाकुन या कार्यक्रमानुसार राबविल्या जाणाऱ्या योजनांना दिशा देण्यासाठी व प्रश्न सोडण्यासाठी व मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविल्या जागणाऱ्या कार्यक्रमा विषयी जनजागृती घडवून आणण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.

4. संशोधनाचे उदिष्टे

1.मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध शासकीय योजनाचा अभ्यास करणे.

2. मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनाच्या लाभाचा अभ्यास करणे.

3. **मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनातुन होणाऱ्या रोजगार निर्मितीतून आर्थिक विकासाचा अभ्यास करणे.**

4. मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबवत असलेल्या विविध योजना पैकी किती योजना प्रत्यक्षात लाभार्थ्यापर्यंत पोहचतात याचा अभ्यास करणे.

5. मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनाचे मुल्यमापन करणे.

6. मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनाच्या लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांचा समस्येचा अभ्यास करणे.

5. संशोधनाची गृहित कृत्ये

1. मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या शासकीय योजनाचा दुर्बल घटक लाभ घेतात.
2. मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनातुन झालेल्या रोजगार वाढी मुळे दुर्बल घटकाच्या उत्पन्नात वाढ होत आहे.
3. मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनामुळे दुर्बल घटकाच्या रोजगारात वाढ होत आहे.
4. मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनामुळे महिलांचे आर्थिक

सक्षमीकरण झाले आहे.

5. मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनामुळे दुर्बल घटकाच्या
राहणीमान दर्जात वाढ होत आहे.

6. संशोधना पध्दती

कोणत्याही विषयातील संशोधना करीत असतांना ते संशोधन शास्त्रशुध्द व्हावे अचुक निष्कर्ष निघावेत, विषयाची उद्‌दिष्ट्ये साध्य करण्यासाठी आणि वस्तुस्थितीचे सत्य आकलन होण्यासाठी विषयानुरुप संशोधन पध्दतीचा अवलंब केला जातो. यामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक संशोधन पध्दती, प्रयोगिक संशोधन पध्दती सर्व्हेक्षणात्मक संशोधन पध्दतीचवा समावेश होतो.

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी सर्व्हेक्षणात्मक व तुलनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला असून तथ्य संकलनासाठी प्राथमिक संमक (सामुग्री) आणि द्‌वितीय संमत (सामुग्री) पध्दतीचा अवलंब केला आहे.

अ) तथ्य संकलन पध्दती

सामाजीक संशोधन पध्दती ही शास्त्रीय स्वरुपाची आहे. ती अनुभव प्रामाण्यावर आधारलेली आहे. सामाजिक संशोधनात समस्या निर्धारण झाले की त्या विषयासंबंधी तथ्य किंवा संमक गोळा करावे लागतात. त्यानंतर संकलीत केलेल्या तथ्याचे वर्गीकरण, संकलन करुन समस्येची सोडवणूक केली जाते. गुड व हॅटच्या मते, “एक अनुभवसिध्द सत्यापनिय अवलोकन म्हणजे तथ्य होय” तसेच निश्‍चित उद्‌देशाने संग्रहित केलेल्या संपुर्ण संख्येच्या समुदायाला तथ्य किंवा संमक म्हणतात तथ्य संकलन करण्याच्या दोन पध्दती आहेत. एक प्राथमिक समक व दुसरी म्हणजे द्‌वितीय संमक होय.

ब) तथ्य संकलनाचे स्त्रोत

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम या दोन्ही स्त्रोताचा किंवा तंत्राचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात आले आहे.

1. प्राथमिक स्त्रोत

प्राथमिक स्वरुपाचे तथ्य संकलन करण्यासाठी मुलाखत अनुसूची तयार करुन घेतली जाणार आणि त्या आधारे परभणी जिल्ह्यातील 9 तालुक्यात मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनाच्या लाभ घेणाऱ्या 200 उत्तरदात्यांना प्रत्येक्ष भेटून त्यांच्या मुलाखती घेऊन अनुसूची स्वत: भरुन घेतल्या जातील त्याच बरोबर निरिक्षण तंत्राचा देखील उपयोग करण्यात येईल.

2. दुय्यम स्त्रोत

अध्ययन विषयाशी संबंधित दुय्यम तथ्य संकलीत करण्यासाठी,जिल्हा मानव विकास समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय परभणी, जिल्हा परिषद, परभणी, ग्रामिण विकास यंत्रण कार्यालय, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, आदिंना भेटी देऊन तेथे उपलब्ध असलेले या विषया वरील प्रकाशीत अप्रकाशीत ग्रंथ, साप्ताहिके तसेच लोक राज्य, कुरुक्षेत्र, योजना, इकॉनॉमिक अँड पॉलिटीकल विक्ली, वर्तमान पत्रे, संशोधन पत्रीका, संदर्भ ग्रंथ इत्यादिच्या माध्यामातुन माहिती गोळा करण्यात येईल.

क) नमुना निवड

“रोजगार निर्मितीमध्ये मानव विकास कार्यक्रमाचे योगदान विशेष संदर्भ परभणी जिल्हा या विषयावरील संशोधनासाठी यादृच्छिक नमुना निवड पध्दतीमधील

कोटा ह्या पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. तसेच नमुना म्हणुन निवडलेल्या उत्तरदात्याची निवड देखिल कोटा पध्दतीने केली आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी परभणी जिल्हयातील ज्या नऊ तालुक्यात मानव विकास कार्यक्रम राबविला जातो. त्या तालुक्यातील विविध योजनाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्या पैकी प्रत्येक तालुक्यातुन 22 लाभार्थ्याची ज्याने मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविला जाणाऱ्या योजनाचा लाभ घेतला आहे. अशा लाभार्थ्याची निवड करण्यात आली असुन म्हणजेच प्रत्येक तालुक्यातुन 22 लाभार्थी म्हणजे एकुण नऊ तालुक्यातील 198 लाभार्थ्याची निवड करण्यात आली. परंतु सांख्यिकीय स्पष्टीकरण करण्यासाठी दोन तालुक्यातुन 22 ऐवजी 23 लाभार्थ्याची निवड करुन एकुण 200 लाभार्थ्याची कोटा पध्दतीने निवड करुन व मुलाखत व अनुसुचीच्या सहाय्याने माहिती संकलीत करण्यात येईल.

ड) तथ्य संकलन

रोजगार निर्मितीमध्ये मानवविकास कार्यक्रमाचे योगदान विशेष संदर्भ परभणी जिल्हा या विषया संबंधीत मुलाखत अनुसुची या तंत्राद्वारे तथ्य संकलीत केले जातील. त्या नंतर संकलीत माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी की (Key) आणि सांकेतीकरणस (Coding) करुन वर्गीकरण करण्यात येईल. त्या नंतर सारण्या तयार करण्यात येतील. काही प्रश्न सामान्य स्वरुपाचे असल्यास सरळ सारणीमध्ये ठेवून त्याचे विश्लेषण केले जोईल. सारण्याच्या आधारे मिळालेल्या सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण करुन निष्कर्ष काढण्यात येतील.

7. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

रोजगार निर्मितीमध्ये मानवविकास कार्यक्रमाचे योगदान विशेष संदर्भ परभणी जिल्हा या संशोधन विषयासाठी रोजगारावर भर देणाऱ्या मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविल्सया जाणाऱ्या योजनाचा अभ्यास करण्यात येईल.

८. संशोधनाचा कालावधी

रोजगार निर्मितीमध्ये मानवविकास कार्यक्रमाचे योगदान विशेष संदर्भ परभणी जिल्हा या विषयाच्या उद्दीष्टानुसार अभ्यास करण्यासाठी 2010-11 ते 2020-21 हा 10 वर्षाचा कालावधी निवडला आहे. या कालावधीमध्ये परभणी जिल्ह्यात मानव विकास कार्यक्रमांतर्गत आर्थिक विकासावर भर देणाऱ्या शासकीय योजनाचाच अभ्यास करण्यात येईल.

प्रकरणाची मांडणी

प्रस्तुत संशोधनाची मांडणी एकुण सहा प्रकरणामध्ये करण्यात येईल. प्रकरणाची रचना पुढील प्रमाणे :

1. **प्रकरण पहिले : प्रस्तावना**
2. **प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन**
3. **प्रकरण तीसरे :परभणी जिल्ह्याचा सामाजिक व आर्थिक अभ्यास**
4. **प्रकरण चौथे :मानव विकास कार्यक्रमांतर्गत आर्थिक विकासावर भर देणाऱ्या योजनाचा अभ्यास**
5. **प्रकरण पाचवे मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनामुळे लाभार्थ्यांच्या रोजगाराच्या स्थितीत झालेल्या बदलाचा अभ्यास**
6. **प्रकरण सहावे निष्कर्ष व शिफारशी**

संदर्भ सुचि

1. **डॉ. विनायक गोविलकर आर्थिक संकल्पना** डायमंड पब्लीकेशन, पुणे
2. **डॉ. के. एच. शिंदे** भारतीय अर्थव्यवस्था, सेठ प्रकाशन, ठाणे, प्रथम आवृत्ती 2006
3. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**, परभणी जिल्हा 2019-20 अथ्र व सांख्यिकी संचलनालय, महाराष्ट्र शासन मुंबई.

४. मानव विकास अहवाल , महाराष्ट्र शासन वर्ष २००२

संशोधक
प्रज्ञा प्रभाकरराव पांढरे
एम.ए. एम. फिल

मार्गदर्शक
डॉ. एस.एस. पतंगे
प्रोफेसर व संशोधक मार्गदर्शक
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
बहिर्जी स्मारक महाविद्यालय,
वसमत जि. हिंगोली.